**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**आरोग्य विभाग**

**मांस विक्री परवाना**

**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ३८१, ३८२ अन्वये)**

**जा.क्र.मनपा/परवाना/ /** **दि. / /**

श्री./श्रीमती ---------------------------------------------------------------------- यांना जनावरांच्या मांस विक्रि करणेचा परवाना महानगरपालिका मालकीच्या दुकानात/खाजगी दुकानात मिरा भाईंदर महानगरपालिका ------------------------------------------------ क्षेत्रात देण्यांत येत आहे.

<u>सदरचा परवाना खालील अटी शर्तीच्या अधीन राहून देण्यांत येत आहे.</u>

१) सदर परवान्याची मुदत अटीशर्ती प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च या तारखेपर्यंत राहील.

२) परवान्यात नमुद केलेल्या गोष्टी व्यतिरिक्त कोणत्याही इतर वस्तुची विक्रि परवाना धारकास करता येणार नाही.

३) मांस विक्री परवानाधारकांनी मांस ऊघड्यावर किंवा रस्त्याने जाणा-या नागरिकांना दिसेल अशा दृष्टीने टांगू किंवा ठेऊ नये. तसेच दुकान पूर्णपणे बंद असावे व दरवाजाला डोअर क्लोजर लावावा.

४) दुकानात मांस हाताळणा-या व्यक्तिस संसर्गजन्य रोग झालेला आढळल्यास सदर परवाना त्वरित रद्द करण्यात येईल.

५) परवानाधारकाने मांस विक्री दुकान योग्य स्थितीत ठेवणे गरजेचे आहे.

६) मांस विक्री व्यवसाय करताना निर्माण झालेले टाकाऊ पदार्थ झाकण असलेल्या बंद कचरापेटीत ठेवणे बंधनकारक राहील.

७) दुकानात जमा झालेले टाकाऊ पदार्थ मनपा घंटा गाडीत टाकणे परवानाधारकांवर बंधनकारक राहील.

८) दुकानात मांस विक्री करणेसाठी ४ फुट उंचीच्या बांधकाम केलेल्या पृष्ठभागावर तंदुर मारबल किंवा शहाबादी लादी लावणे बंधनकारक राहील.

९) दुकानाच्या सर्व भिंतीना ५ फुटपर्यंत टाईल्स लावणे बंधनकारक राहील.

१०) दुकानाची जमीन शहाबादी फर्शी संगमरवर किंवा टाईल्स यांनी बनविलेली असावी.

११) दुकानाच्या भिंतीना वर्षातुन ऑईल पेंट लावणे आवश्यक आहे.

१२) परवानाधारकांनी मांस विक्री करण्यात येणारे दुकान दररोज जंतूनाशक व दुर्गंधी नाशकाने दोन वेळा स्वच्छ करणे गरजेचे आहे. तसेच दुकानाच्या सभोवतालीचा परिसर साफ ठेवणे गरजेचे आहे.

१३) परवानाधारकांनी दुकानात पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

१४) मांस विक्री दुकानात पुरेसे वायुविजन व्यवस्था व प्रकाशाची व्यवस्था असावी.

१५) दुकानात काम करणा-या कामगारासाठी वैद्यकीय तपासणी नियमितपणे करणे

आवश्यक आहे. तशी नोंद परवानाधारकांनी देणे गरजेचे आहे.

१६) मांस विक्री दुकानाचा वापर राहण्यासाठी करण्यात येऊ नये.

१७) कापलेल्या जनावराचे मांसाची बंद गाडीतूनच वाहतूक करण्यात यावी.

१८) परवानाधारकांनी मांस कापतेवेळी वापरात येणारे लाकडी ठोकळे दररोज साफ करणे आवश्यक आहे.

१९) परवानाधारकांनी मांस विक्री दुकानात कुत्रा, मांजर किंवा अन्य कोणतेही पाळीव प्राणी मांस विक्री दुकानात ठेऊ नये.

२०) काही कारणाने परवानाधारकाचा परवाना रद्द केला असेल तर मांस विक्रीचा व्यवसाय तातडीने बंद करणे सक्तीचे आहे.

२१) परवानाधारकांनी प्राप्त झालेला परवाना, फोटो लावून सदर परवाना दुकानात दर्शनी भागावर लावणे गरजेचे आहे. तसेच महापालिकेकडून मागणी केल्यास सदर परवान्याची प्रत सादर करणे गरजेचे आहे.

२२) महानगरपालिकेने सांगितलेल्या वेळी मांस विक्रीचे दुकान बंद ठेवणे बंधनकारक राहील.

२३) मोठया जनावरांचे मांस फक्त अधीकृत कत्तलखान्यातुन कत्तल केलेल्या जनावरांचेच असावेत. त्याचा पुरावा रोज दुकानदाराने दुकानात ठेवणे आवश्यक आहे. या अटीचा भंग झाल्यास दुकानदाराचा त्वरित परवाना बंद करण्यात येईल.

२४) मोठया जनावरांचे मांस विक्री व्यवसायीकांनी गाईचे व बछडयाचे मांस तसेच शासकीय व महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी सुचविण्यात येईल. ते मांस विकणे सक्त मनाई राहील.

२५) सदर व्यवसायाबाबत शासकीय परवानगी घेणेची जबाबदारी अर्जदारावर राहील.

२६) सदर परवाना / नूतनीकरण परवान्यामुळे अनधिकृत बांधकाम अधिकृत होत नाही.

वरील पैकी कोणत्याही अटीशर्तीचा भंग झाल्यास किंवा सदर दुकानाबाबत आजुबाजुच्या रहिवाश्याची इमारतीमधील लोकांचा आक्षेप असल्यास सदर बाबत तपासणी करुन महानगरपालिकेने दिलेला परवाना रद्द केला जाईल.

**उप-आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**